**-पशुसंवर्धन विषयक प्रशिक्षणाचे निवेदन-**

पशुसंवर्धन विषयक दुग्धव्यवसाय प्रशिक्षण,शेळी/मेंढी पालन प्रशिक्षणाचे आयोजन नंदुरबार जिल्हयात करण्याचे नियोजन आहे.सदर प्रशिक्षणाचा कालावधी एक आठवडयाचा आहे.प्रशिक्षण शुल्क रू. २००/-(मागासवर्गीयांसाठी व दारिद्रय रेषेखालील कुटुंब यांना रू.१००/-) आहे. सदर प्रशिक्षणासाठी पात्रता व अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे-

१. रोजगार व स्वयंरोजगार /समाजकल्याण / आदिवासी विभाग कार्यालय यांचेकडे नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत

२. शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित प्रत

३. प्रशिक्षणार्थी मागासवर्गीय असल्यास सदर दाखल्याची साक्षांकित प्रत

४. प्रशिक्षणार्थी दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील असल्यास सदर कार्डाची साक्षांकित प्रत

५. प्रशिक्षणार्थीचे वय १८ ते ३५ वर्षापर्यंत असावे.

६. प्रशिक्षणार्थीची शैक्षणिक पात्रता - किमान ४ थी उत्तीर्ण

प्रशिक्षणाबाबत माहितीसाठी स्थानिक पशुवैदयकिय दवाखाने ; पशुधन विकास अधिकारी (विस्तार),पंचायत समिती ; सहायक आयुक्त पशुसंवर्धन , तालुका लघु पशुसर्व चिकित्सालय यांचेशी संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,जिल्हा परिषद,नंदुरबार (०२५६४-२२४७२२)अथवा जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,नंदुरबार (०२५६४-२१००१६)यांचेशी संपर्क करावा.

डॉ.एस.बी.तटवर्ती

**जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त**

**नंदुरबार**